# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०३.२०२५

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (२२.०३.२०२५ ते २८.०३.२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२९.०३.२०२५ ते ०२.०४.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | दिनांक | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ४.६ | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | १० | ७ | ३ | १ |
| ३७.० | ३७.० | ३७.५ | ३७.४ | ३७.० | ३६.० | ३६.८ | कमाल तापमान (अं.से.) | ३७ | ३८ | ३७ | ३६ | ३५ |
| १९.० | १९.२ | १९.० | २३.५ | २१.० | २२.० | २१.२ | किमान तापमान (अं.से.) | २१ | २३ | २४ | २४ | २४ |
| ० | ० | ६ | ७ | ० | ० | ० | स. ढग स्थिती (आकाश) | ३ | २ | २ | २ | ३ |
| ० | ० | ० | ४ | ४ | २ | | दु. | | | | | |
| ५९ | ७६ | ८७ | ७७ | ९५ | ६९ | ६५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४९ | ५० | ५१ | ५१ | ५१ |
| २९ | ३० | ४४ | ४३ | ४२ | ४५ | ४२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३० | ३१ | ३१ | ३० | ३१ |
| २.३ | २.२ | २.५ | २.८ | २.७ | ३.० | २.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ४ | २ | २ | १ |
| प.वा. | प. | पू.आ. | प.वा. | द.नै. | वा. | वा. | स. वाऱ्याची दिशा | ३४८ | ३३८ | २४३ | २०७ | २५२ |
| वा. | उ. | ई. | उ.वा. | प.वा. | प.वा. | उ. | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२५ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२५पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ४.६ | ४.६ | १ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २९ मार्च ते २ एप्रिल दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक ३० मार्च ते २ एप्रिल दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पुढील ५ दिवस कमाल तापमानात ३८.० ते ३९.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत किमान तापमान २१.० ते २४.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ४९ ते ५१% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ३० ते ३१% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी १ ते ३ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ४ ते १० एप्रिल, २०२५ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी तसेच कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त तर किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान इशारा | | कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २९ व ३० मार्च रोजी तुरळक ठिकाणी मेघर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ जिल्ह्यामध्ये ३० मार्च ते २ एप्रिल दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या पिकाची (गहू, ज्वारी, मका, व कांदा) काढणी व मळणी करावी व तयार शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा.<br>➢ मार्चमध्ये ऊस पिकास प्रती दिवस ६.०६ लिटर पाण्याची गरज असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४लिटरचा ड्रीपर) दररोज १ तास आणि ३१ मिनिटे चालू ठेवावा.<br>➢ दिनांक २९ व ३० मार्च रोजी मेघर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे शेतकरी बंधूंनी स्वत:ची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी |
| संदेश | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" तर विजांचा कडकडाटच्या अंदाजासाठी "दामिनी" हे अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करून वापरावे. |
| गहू | काढणी | ➢ दिनांक ३० मार्च ते २ एप्रिल दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या गहू पिकाची मळणी करावी व तयार शेतीमाल त्वरित सुरक्षित ठिकाणी ठेवावा.<br>➢ गहू बियाणे साठवणुकीच्या काळात सोंडेकिडीच्या नियंत्रणासाठी उन्हात वाळवलेल्या प्रती किलो बियाण्यास १० ग्रॅम याप्रमाणे वेखंड भुकटीची बीज प्रक्रिया करावी. |
| मका | पक्वता | ➢ दिनांक ३० मार्च ते २ एप्रिल दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या मका पिकाची मळणी करावी व तयार शेतीमाल त्वरित सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| रब्बी ज्वारी | दाणे भरणे ते पक्वता | ➢ दिनांक ३० मार्च ते २ एप्रिल दरम्यान तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या ज्वारी पिकाची मळणी करावी व तयार शेतीमाल त्वरित सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| भुईमुग | वाढीची | ➢ कोरड्या हवामानामुळे भूईमुग पिकावर तुडतुडे, फुलकिडे व नाग आळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ ई.सी. २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>➢ उन्हाळी भुईमूग पिकास जमिनीच्या मगदूराप्रमाणे ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| ऊस | वाढीची | ६ ते ८ आठवड्यांच्या सुरु उसाला नत्र खतांचा दुसरा हप्ता ४०% नत्र (१०० किलो नत्र म्हणजेच हेक्टरी २१७ किलो युरिया) द्यावा. |
| मिरची | फळ वाढीची | ➢ मागील आठवड्यामध्ये कोरडे हवामान राहिल्याने काही ठिकाणी कोळी किडीचा प्रादुर्भाव वाढला आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी फेनप्रोपॅथ्रीन ३०% ईसी ५ मिली किंवा फेनॅक्झाक्विन १० ई.सी. २५ मिली प्रती १० लीटर पाण्यातून फवारणी करावी. |
| दोडका | फुलोरा | ➢ उन्हाळी वेलवर्गीय भाजीपाला पिकांस खुरपणी देऊन नत्र खताचा दूसरा हप्ता द्यावा<br>➢ वेलवर्गीय पिकांना आधार देण्याचे काम पूर्ण करावे. |
| आंबा | फळ वाढीची | ➢ साधारणतः अंड्याच्या आकाराच्या फळांना फळ माशीचा प्रादुर्भाव होऊ शकतो. फळगळ झालेली असल्यास पडलेली फळे गोळा करून नष्ट करावीत व रक्षक फळ माशी सापळे @ २ प्रती एकर या प्रमाणात लावावेत. |
| कांदा | पक्वता | ➢ पक्व झालेल्या कांदा पिकाची काढणी करावी व काढलेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| टोमॅटो | वाढीची | ➢ मागील आठवड्यामध्ये कोरडे हवामान राहिल्याने काही ठिकाणी टोमॅटो पिकावर पांढरी माशी व फुलकिड्यांच्या प्रादुर्भाव दिसून येत आहे नियंत्रणासाठी कोरडे हवामान असताना इमिडाक्लोप्रीड ०.५ मि.लि. प्रती लिटर पाण्यातून फवारावे.<br>➢ दिनांक १९ मार्च रोजी तुरळक ठिकाणी जोरदार वाऱ्यासाह हलक्या पावसाची शक्यता असल्याने टोमॅटो झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून टोमॅटो रोपांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| पशुधन | वाढीची | ➢ लाळ खुरकुत रोगापासून बचावासाठी निरोगी जनावरांना लाळ खुरकुत रोगाची रोगप्रतिबंधक लस मार्च महिन्यामध्ये अधिकृत पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने टोचून घ्यावी. ३ महिन्याच्या आतील तसेच गाभण जनावरांना लस देणे टाळावे.<br>**जनावरांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पुढील उपाय करावेत…**<br>➢ म्हशींना घर्मग्रंथी खूप कमी असल्याने व त्यांची त्वचा काळी असल्याने वाढणाऱ्या तापमानाचा गायींपेक्षा म्हशींना त्रास जास्त होतो म्हणून म्हशींना पाण्यात डुंबन्यास सोडावे.<br>➢ जनावरे सावलीच्या ठिकाणी बांधावीत. शक्य असल्यास दिवसातून ४ ते ५ वेळा त्याच्या अंगावर पाणी फवारावे.<br>➢ जनावरांना पुरेशे, शुद्ध व थंड पाणी पिण्यास द्यावे. जनावरांना पुरेसा प्रथिनेयुक्त व हिरवा चारा आणि खनिजमिश्रण द्यावे.<br>➢ दुपारच्या वेळेस जनावरे चारावयास नेऊ नयेत. |
| पोल्ट्री पक्षी | वाढीची | पोल्ट्रीमधील पक्षांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पोल्ट्रीच्या बाजूने बारदाणे लावावेत व त्यावर वारंवार पाणी शिंपडावे जेणेकरून आतील तापमान कमी राहण्यास मदत होईल.तसेच पोल्ट्रीमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी . |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : २८.०३.२०२५

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर